

लोकमत औरंगाबाद अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होणाऱ्यास अनेक औद्योगिक क्षेत्रातून ग्रुप बुकिंसाठी पुढाकार घेण्यात येत आहे. याचा प्रथम मान मिळवणारा ग्लेनमार्क फार्मास्युटिकल लि. कंपनीचा ग्रुप.

# लोकमत औरंगाबाद मॅरेथॉनला प्रतिसाद

**औरंगाबाद :** औरंगाबाद शहरातील नागरिकांत तंदुरुस्तीविषयी जागरूकता निर्माण व्हावी या उदात्त हेतूने लोकमत समूहातर्फे आयोजित लोकमत औरंगाबाद अर्ध मॅरेथॉनला चांगला प्रतिसाद मिळत असून, ग्लेनमार्क फार्मास्युटिक्स लिमिटेडच्या ग्रुपने या प्रतिष्ठित मॅरेथॉनमध्ये आपला सहभाग निश्चित केला आहे.

लोकमत समूहातर्फे ११ डिसेंबर रोजी औरंगाबाद मॅरेथॉनचे आयोजन




करण्यात येत आहे. या मॅरेथॉनला खेळाडू, प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. ही मॅरेथॉन ५ कि.मी., १० कि.मी. आणि २१ कि.मी. या गटात होणार आहे.

विशेष म्हणजे या अर्ध मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यास औद्योगिक क्षेत्रातूनही ग्रुप बुकिंगसाठी पुढाकार घेण्यात येत आहे. त्यात पहिला मान हा ग्लेन फार्मास्युटिकल लि. या कंपनीने मिळवला आहे. या कंपनीतील ३० पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग निश्चित केला आहे.

या प्रतिष्ठित मॅरेथॉनमध्ये कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या ग्रुप बुकिंसाठी आश्विन सिंग (९०७५००५२३५) यांच्याशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे खेळाडू, नागरिक व ग्रुपसाठी mycitymarathon.com या संकेतस्थळाला भेट देऊन नावनोंदणी करता येईल. तसेच मॅरेथॉनप्रेमींना facebook.com/AurangabadMarathon हे पेज लाईक करून स्पर्धेची माहिती घेता येईल.

## औरंगाबाद जिल्ह्याचा जिम्नॅस्टिक संघ रवाना

**औरंगाबाद :** पुणे येथे २५ व २६ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी औरंगाबादचा संघ रवाना झाला.

रवाना झालेला औरंगाबादचा विविध वयोगटांचा संघ : ऋत्विक भाले, धैर्यशील देशमुख, रोहित बारुलकर, तुषार काशीद, दानीश शेख, विश्वजित राऊत, अजय पहूरकर, रजत मेघावाले, सिद्धांत सोनटक्के, मानसी देशमुख, सिद्धी हत्तेकर, रिची भंडारी, रिद्धी हत्तेकर, मृण्मयी कुलकर्णी, ऋतिका महाजन, शर्वरी लिमये, समृद्धी मिरगणे, प्रियंका लिंगायत, ऋतुजा महाजन, अद्वैत कुलकर्णी, आयुष मुळे. प्रशिक्षक सूरज ताकसांडे, मयूर बोढारे, तनुजा गाढवे.

व्यवस्थापक : प्रवीण शिंदे. पंच म्हणून विशाल देशपांडे, रणजित पवार व सागर कुलकर्णी जाणार आहेत.

या संघास मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद भोगले, सचिव रामभाऊ पातूरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक आणि एमएसएम शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप दुबे, संकर्षण जोशी, मकरंद जोशी, सागर कुलकर्णी यांनी शुभेच्छा दिल्या.

## डीबीए अ, मनपाची प्रतिस्पर्धी संघांवर मात

### मनोज घोडके, गौरव शिंदे चमकले

**औरंगाबाद :** जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु झालेल्या आंतरऔद्योगिक टी-२० क्रिकेट स्पर्धेत डीबीए अ आणि मनपा ब संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. अनुभवी शैलीदार फलंदाज मनोज घोडके आणि गौरव शिंदे यांचे आक्रमक अर्धशतक हे आज झालेल्या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले.

पहिल्या सामन्यात मनोज घोडके याने केलेल्या चौफेर फटकेबाजीच्या बळावर पीडब्ल्यूडी संघाने २० षटकांत ७ बाद १३१ धावा केल्या. मनोज घोडकेने १० चौकारांची आतषबाजी करताना आणि ३ टोलेजंग षटकार ठोकत ८७ धावांची वादळी खेळी केली. श्याम टाकळकरने १० धावा केल्या.

डीबीए अ संघाकडून विजय सोनवणेने २, तर गोपाल पांडे व गौरव शिंदे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. प्रत्युत्तरात गौरव शिंदेच्या सुरेख नाबाद ५० धावांमुळे डीबीए अ संघाने विजयी लक्ष्य १३.३ षटकांत ३ गडी गमावून



मनोज घोडके



गौरव शिंदे

पूर्ण केले. गौरवला विजय सोनवणेने २२ व उदय पांडेने २७ धावा करीत साथ दिली. पी.डब्ल्यू.डी.कडून मनोज घोडके व श्याम टाकळकर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

दुसऱ्या सामन्यात मनपा ब संघाने ९ बाद ११७ धावा केल्या. त्यांच्याकडून अल्ताफ खानने ३८ व ऋषिकेश तरडेने १८ धावा केल्या. आयजीटीआरकडून नीलेश जाधव, महेश वझे व अमित चौधरी यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. प्रत्युत्तरात आयजीटीआर ९९ धावांत गारद झाला. त्यांच्याकडून महेश वझेने ४९, दीपक जगतापने ३० धावा केल्या. मनपाकडून ऋषिकेश तरडे व रईस अहमद यांनी प्रत्येकी ३, तर दीपक जावळेने २ गडी बाद केले.

## महाराष्ट्र संघावर पराभवाचे सावट

**पुणे :** रणजी चषक क्रिकेट स्पर्धेत सौराष्ट्रविरुद्ध फॉलोऑनची नामुष्की पत्करणाऱ्या महाराष्ट्रासमोर डावाने पराभव टाळण्याचे आव्हान आहे. शनिवारी, तिसऱ्या दिवसअखेर महाराष्ट्राने दुसऱ्या डावात २ बाद ११४ धावा केल्या. रविवारी सामन्याचा अखेरचा दिवस असून महाराष्ट्र संघ सौराष्ट्राच्या पहिल्या डावातील धावसंख्येच्या तुलनेत अद्याप ३६१ धावांनी मागे आहे.

विजियानगरम् (आंध्र प्रदेश) येथील डॉ. पीव्हीजी राजू स्टेडियमवर सुरू असलेल्या या लढतीत सौराष्ट्राने पहिला डाव ८ बाद ६५७ धावांवर घोषित केल्यानंतर महाराष्ट्राला १८२ धावांवर गुंडाळून सामन्यावर पकड निर्माण केली.

मध्यमगती गोलंदाज कुशांग पटेल आणि डावखुरा फिरकीपटू धर्मेंद्रसिंग जडेजा यांनी प्रत्येकी ५ बळी घेत महाराष्ट्रावर फॉलोऑन लादण्यात निर्णायक भूमिका बजावली. महाराष्ट्रातर्फे सलामीवीर मुर्तुझा ट्रंकवालाने सर्वाधिक ६४ धावा (१३९ चेंडूंत ११ चौकार) केल्या. त्याचा अपवाद वगळता महाराष्ट्राचा एकही फलंदाज खेळपट्टीवर तग धरू शकला नाही.





